मुलांसाठी बाइबल
प्रस्तुत



# रुथ : एक प्रेम कथा

लेखक: Edward Hughes

रेखाचित्रकार: Janie Forest

रूपान्तरकार: Lyn Doerksen

अनुवादक: Rev. Shilas Gavit

निर्माता: Bible for Children
www.M1914.org

©2017 Bible for Children, Inc.
परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्ट विकत नाहीत, तोपर्यंत तुम्ही तीं कॉपी किंवा मुद्रित करू शकता.

जर तुम्ही तुमच्या पणजोबांना, त्यांच्या आईवडिलांना,
आणि तुमच्या आधि जे सर्व लोक होऊन गेले त्यांना
भेटले, तर ते कोणत्या प्रकारचे लोक होते हे
जाणून तुम्ही कदाचित आश्चर्यचकित व्हाल.
पवित्र शास्त्रात देखिल येशूची एक पुर्वज;
रुथ हिच्याविषयी सांगितले आहे
ती एक मवाबी
स्त्री व
मुर्तिपुजक होती.



शमशोनाच्या दिवसानंतर इस्त्राएलात जेंव्हा देवाच्या लोकांनी देवावर विश्वास करण्याचे आणि त्याचे आज्ञापालन करण्याचे थांबविले येथून रुथच्या गोष्टीला सुरवात होते. त्या काळी त्या देशात भयंक दुष्काळ पडला. दुष्काळ काय असतो तुम्हांला माहित आहे का? अगदी बरोबर आहे ! जेंव्हा फळ किंवा पिकांची वाढ होत नाही, आणि





जनावरे व काही वेळा माणसे देखिल भुकेने मरण पावता त्याला दुष्काळ असे म्हणतात.

तेथे अलीमलेख नावाचा एक मनुष्य होता, त्याने त्याची पत्नी व त्याचे दोन पुत्र ह्यांना घेतले व बेथलेहेम सोडून अन्नाच्या शोधात निघाला. तो मुर्तिपजा करणाऱ्या लोकांच्या देशात, म्हणजे मवाब देशात गेला.




मवाब देशात अलीमलेखसाठी व त्याच्या कुटुंबासाठी चांगले घडले नाही.
खिल्योन
अलीमलेख
महलोन
तो मरण पावला, त्याच्यानंतर त्याचे दोन्ही पुत्र देखिल मरण पावले.


त्याच्या दोन्ही
मुलांच्या पत्नीं रुथ आणि
अर्पा या दोन्ही मुली देखिल मवाबी
होत्या,
खिल्योन
अलीमलेख
महलोन
यांच्यासोबत अलीमलेखची पत्नी नामी मागे राहिली.

नामी, आता विधवा होती, तिला कळले की परमेश्वर देवाने आता त्याच्या लोकांची भेट घेऊन त्यांना अन्न दिले आहे. तेंव्हा तिने तिच्या मायदेशी परत जाण्याचा निर्णय घेतला.



परंतू या दोन्ही मुली आता काय करणार? नामीने त्यांना मवाब देशातच राहून पुन्हा लग्न करुन घेण्याचा सल्ला दिला.



अर्पा तिच्या कुटुंबाकडे परत गेली. परंतू रुथने परत जाण्यास नकार दिला. तिने एक सुंदर कविता म्हटली, तिचा अर्थ असा होता की तिच्या घरि परत जाण्याऐवजी ती तिच्या सासूबाईंना कधिही सोडणार नाही.



नामी बेथलेहेमात तिच्या घरि परत आली हे पाहून नामीच्या पुर्वींच्या मैत्रीणींना आनंद झाला. परंतू तिने त्यांना म्हटले मला नामी म्हणजे मनोरमा ऐवजी "मारा"(म्हणजे क्लेशमया) म्हणा. "कारण सर्वसमर्थाने मला फार क्लेश दिले आहे." नामी जेंव्हा परत आली तेंव्हा तिच्याकडे रुथशिवाय काहिच नव्हते.





मवाबातील बहुतांश लोकांप्रमाणे जरी
रुथने मुर्तिपुजा केली होती, तरी आता
ती तेथून निघून इस्त्राएलांत जिवंत
देवाची भक्ति करण्यास आली होती.
भरपूर काबाड–कष्ट करुन नामीला
खाण्यासाठी पुरेसे अन्न राहिल याची
रुथने काळजी घेतली होती. प्रत्येक
दिवशी ती शेतात जाऊन कापणी करणाऱ्यांच्या
मागून सरवा
वेचीत असे.







रुथ तिच्या सासूबाई संगती किती चांगली वागते याविषयी त्या शेताचा मालक बवाज याला कळले. जेंव्हा तो तिला भेटला, तेंव्हा कापणी करणाऱ्यांना त्याने सांगितले की पेंढ्यांतून मुठ मुठ टाकीत जा. रूथ बवाजला आवडू लागली.



रुथने जेंव्हा नामीला बवाज
आणि त्याच्या दयाळूपणाविषयी
सांगितले, तेंव्हा त्या वृध्द्
महिलेने देवाची स्तुति
केली. आणि म्हणाली,
"तो मनुष्य आपला
नातेवाईक आहे,
तो आपल्या
आप्तजनांपैकी
एक आहे."



काही दिवस गेल्यावर, बवाज रुथ संगती लग्न करुन तिची सासू नामी व त्यांची जमिन यांची देखभाल करु इच्छित होता. परंतू दुसऱ्या जवळच्या नातेवाईकाला पहिली संधी होती. या माणसाला त्यांची जमीन हवी होती परंतू रुथ पत्नी म्हणून नको होती. कायद्यानुसार दोन्हीही सोबतच घेणे आवश्यक होते; दोन्ही पैकी एक तो घेऊ शकत नव्हता.



त्या दिवसातील लोक, एखादा ठराव झाला हे दाखवण्यासाठी हस्तांदोलन करित नसत. बवाजने त्याच्या पायातील जोडे काढून सर्व लोकांच्या देखत त्या जवळच्या नातलगाला दिले. त्यांच्यातील व्यवहार पुर्ण झाला होता.



आता रुथ त्याची पत्नी बनू शकत होती. आता नामी आणि रुथ बवाजच्या कुटुंबातील सदस्य बनले होते.



बवाज आणि रुथ यांना
पहिला मुलगा झाला
त्यांनी त्याचे नाव
ओबेद असे ठेवले. तो
इस्त्राएलांचा महान
राजा दाविद याचा
आजोबा झाला.

याच्यापेक्षा अधिक अद्‌भुत गोष्ट अशी की हे ओबेद बाळ प्रभू येशू ख्रिस्ताचा पुर्वज बनला. राजांचा राजा आणि जगाचा तारणारा असा येशू, दाविद राजाच्या वंशात जन्मास आला.



रुथ : एक प्रेम कथा

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

रुथ

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

समाप्त

बाइबलमधील ही गोष्ट आम्हांला आमच्या सुंदर ईश्वराविषयी सांगते ज्याने आम्हांला बनविले आणि ज्याची इच्छा अशी आहे की आम्ही त्याला ओळखावे.

ईश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मृत्यू आहे, पण ईश्वर तुमच्यावर इतके प्रेम करतो की त्याने तुमच्या पापांसाठी शिक्षा मिळावी आणि क्रॉसवर मरण यावे म्हणून त्याच्या एकुलत्या पुत्राला येशूला पाठविले. नंतर येशू पुन्हा जिवंत झाला आणि स्वर्गातल्या घरी गेला. जर तुम्ही येशूमध्ये विश्वास ठेवता आणि तुमच्या पापांसाठी त्याने क्षमा करावी अशी त्याला विनंती करता, तर तो नक्की क्षमा करील. तो आता तुमच्याबरोबर येऊन राहील आणि तुम्ही त्याच्याबरोबर कायम राहणार.

जर हे सत्य आहे यावर तुम्ही
विश्वास ठेवता, तर ईश्वराला हे सांगा:

प्रिय येशू, तू ईश्वर आहेस आणि माझ्या पापांसाठी मृत्यू भोगण्यास मनुष्य बनलास आणि आता तू पुन्हा जगतोस यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांसाठी मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल, आणि एक दिवस मी कायम तुझ्याबरोबर राहण्यासाठी निघेन. तुझी आज्ञा पाळण्यासाठी आणि तुझे मूल होऊन जगण्यासाठी मला मदत कर. आमेन.

बाइबल वाचा आणि ईश्वराशी रोज बोला!
जॉन 3:16